# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## बारामतीमधील नमो रोजगार मेळाव्याच्या निमंत्रणपत्रिकेत अखेर शरद पवार यांचे नाव

पुणे दि.२ (प्रतिनिधी)- बारामती येथे होणाऱ्या 'नमो महा रोजगार मेळाव्या'साठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना या कार्यक्रमाचे निमंत्रण न देण्यावरून वाद सुरू झाला असतानाच जिल्हा प्रशासनाकडून पवार यांना निमंत्रण देण्यात आले आहे. जिल्हा प्रशासनाकडून मेळाव्याची सुधारित निमंत्रणपत्रिका प्रसिद्ध करण्यात आली आहे.

कौशल्य रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या वतीने विभागस्तरीय नमो महारोजगार मेळावा बारामती येथे आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा दोन आणि तीन मार्च रोजी होणार आहे. या मेळाव्याचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे उपस्थित राहणार आहेत.


(वर्ष ६३ वे अंक ६८) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. - ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार, दि.०२ मार्च २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


# आम्ही शेतकऱ्यांचे अश्रू पुसले-मुख्यमंत्री शिंदे

## विरोधकांनी आम्हाला कायदा सुव्यवस्थेबद्दल सांगू नये, त्यांचे गृहमंत्रीच जेलमध्ये गेले

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- कायदा सुव्यवस्था धोक्यात आली आहे, असं विरोधक वारंवार म्हणत होते. मात्र आम्ही या गुन्ह्यांचं समर्थन करणार नाही. तर त्या सर्वांवर कारवाई केली जाईल. मात्र ज्यांचे गृहमंत्री हेच जेलमध्ये गेले आहेत. त्यांनी आम्हाला कायदा आणि सुव्यवस्थेबद्दल काहीही शिकवू नये असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत बोलतांना म्हटले.

विरोधक कोमात गेले आहेत. त्यामुळेच ते शेतकरी कोमात गेल्याचा आरोप करतात. आम्ही शेतकऱ्यांचे अश्रू पुसले आहेत. मात्र, तुमचे सरकार असताना तुम्ही त्यांच्या तोंडाला पाने पुसली, असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत विरोधकांना सडेतोड प्रत्युत्तर दिले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी शेतकऱ्यांसाठी सरकारने कोणकोणत्या योजना लागू केल्या आहेत, याची थेट यादीच वाचून दाखवली. विरोधकांकडून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र आम्ही शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेत असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

कायदा सुव्यवस्थेचं समर्थन करणार नाही. मात्र या घटनेचं राजकारण करणं यापेक्षा मोठं दुर्दैव नाही. यामध्ये तरूणांचेही खून झाले आहेत. यात हनुमान चालीसा म्हटल्यावर देशद्रोहाचं उदाहरण, खासदार आमदारांना, अर्नब गोस्वामी, कंगना रनौत, याकुबच्या कबरीचं उदारीकरण केलं. यांना जीवा महाले यांचं स्मारक आठवलं नाही. मविआचे सरकार असतांना त्यांनी हुकुमशाही पद्धतीने खोटे गुन्हे दाखल केले. त्यामुळे तुम्हाला यावर बोलण्याचा अधिकार नाही. आम्ही कधीही कुणावर अन्याय केला नसल्याचेही शिंदे म्हणाले.

लोकांवर खोटे गुन्हे दाखल करून त्यांना जेलमध्ये दाखल केलं. जो कायदा मोडणार त्यालाही आम्ही सोडणार नाही. तसेच चुकीची कारवाईदेखील आम्ही कधी करणार नाही. पुणे पोलिसांनी ड्रग्ज पकडले त्यांच्यावर आम्ही कारवाई केली. ज्यांचे गृहमंत्रीच जेलमध्ये जातात. त्यांनी आम्हाला कायदा सुव्यवस्थेबद्दल काही शिकवू नये. जितेंद्र आव्हाड तुमचा काय अधिकार आहे. तुम्ही या कायदा आणि सुव्यवस्थेवर काहीही बोलू नये. ज्यांनी एका सर्वसामान्य माणसाला काळ निळं होईपर्यंत मारलं आणि आता त्यांनीच आम्हाला संस्कार काय हे शिकवणे, हेच तुमचे संस्कार आहेत का? असा सवाल करत एकनाथ शिंदे यांनी आव्हाडांवरही हल्ला चढवला.

शेतकऱ्यांना काय दिलं? असे विरोधक नेहमीच म्हणत असतात. विरोधकांना शेतकऱ्यांशी काही देणंघेणं नाही. खोटं बोलायचं पण रेटून बोलायचं अशी त्यांची परिस्थिती आहे. शेतकरी कोमात आहे. असे विरोधक म्हणाले. अशी भाषा शेतकऱ्यांबद्दल बोलणं योग्य नाही. शेतकरी हा आपला आत्मा आहे. हे शेतकऱ्यांचं, कष्टकऱ्यांचं सरकार आहे.

मोदीच्या गॅरंटीमुळे अजितदादा आमच्यासोबत आले. त्यामुळेच राज्यात विकासात्मक धोरण राबविले जात आहेत. अशोक चव्हाणही आमच्यासोबत आलेत. आणखी काही लोक आमच्यासोबत जुळले आहेत. सकाळी आपल्यासोबत असलेला नेता दुपारी आपल्यासोबत राहिल की नाही, याची विरोधकांना चिंता आहे. विकासाच्या भरधाव गाडीसमोर गतिरोधक लावण्याचा प्रयत्न काही लोकांनी केल्याचंही मुख्यमंत्री म्हणाले.

# गृहमंत्र्यांची कार्यक्षमता कुठे हरवली-वडेट्टीवार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मौनात असल्याचा आरोप

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रात गुंडाना राजाश्रय मिळतो आहे. ड्रग्जचा विळखा, हत्यांची मालिका, डान्सबारमुळे राज्याची प्रतिमा मलिन झाली आहे. गृहमंत्र्यांची कार्यक्षमता कुठे हरवली आहे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मौनात आहेत, तर अजितदादांना काय बोलायचे कळत नाही, असे म्हणत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत सरकारला घेरले. अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना. वडेट्टीवार बोलत होते.



छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आणि संत महात्म्यांचा महाराष्ट्र अशी आपल्या राज्याची ओळख आहे. परंतु गेल्या दोन वर्षात घोटाळेबाजांचा, वसुलीचा, खोकेबाजांचा, पक्ष फोडोफोडीचा महाराष्ट्र अशी राज्याची नवी ओळख करण्यात शिंदे सरकारने मोठी प्रगती केली असल्याचा हल्लाबोल ही त्यांनी केला.

वडेट्टीवार म्हणाले की,पुण्यात नवीन मुळशी पॅटर्न सुरू झालाय. या नव्या मुळशी पॅटर्नचे खरे आश्रयदाते कोण आहेत. याचा शोध सरकारने घेतला पाहिजे. आजी माजी नेत्यांमध्ये गुन्हेगार वापरण्यावरून वाद सुरू झाले आहेत. पुण्यातल्या गुंडांना क्राईम ब्रँचच्या काही सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे मार्गदर्शन आहे. हा सेवा निवृत्त अधिकारी नोकरीत असताना आणि नोकरीत नसतानाही पुण्यातल्या टोळ्या चालवतोय. राजकीय पदाधिकाऱ्यांना नेत्यांना धमकावण्यासाठी गुंडांना पॅरोलवर सोडले जातेय. पुण्यात २०० गुंडांची परेड करण्याची वेळ आली. हे दुर्दैव आहे. पुण्यात अमितेश कुमारांनी गुंडांची परेड घेतली. त्यानंतर काही दिवसातच २२०० कोटींचे ड्रग्ज सापडले. इतकी गंभीर परिस्थिती पुण्यात असल्याचे खडे बोल वडेट्टीवार यांनी सुनावले आहेत.

## मराठा आरक्षणाविरोधात हायकोर्टात याचिका

### गुणरत्न सदावर्तेंकडून १० टक्के आरक्षणाला आव्हान

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- एकीकडे मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील आक्रमक झाल्याचं पाहायला मिळत असताना आता मराठा आरक्षणाचा वाद हायकोर्टात पोहोचला आहे. उच्च न्यायालयात मराठा आरक्षणावर लवकरच सुनावणी पार पडणार आहे. मराठा आरक्षणाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात सदावर्तेकडून दिवाणी रिट याचिका दाखल करण्यात आली आहे.

राज्य सरकारने मराठा समाजाला दिलेल्या १० टक्के आरक्षणाप्रकरणी सदावर्तेंनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. डॉ. जयश्री पाटील यांच्याकडून राज्य सरकारनं जारी केलेल्या १० टक्के मराठा आरक्षणाला आव्हान देण्यात आलं आहे. २७ फेब्रुवारी रोजी रोस्टर पद्धतीत केलेल्या बदलालाही आव्हान देण्यात आलं आहे.

निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांची आयोगाच्या अध्यक्षपदी झालेली नेमणूक चुकीची असल्याचा याचिकेतून आरोप करण्यात आला आहे. तर निवृत्त न्यायमूर्ती दिलीप भोसले यांना सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांपेक्षाही जास्त मानधन दिलं गेल्याचा याचिकेतून दावा करण्यात आला आहे.

## आज गावागावांत गरीब, मजूर, शेतकरी दुःखी

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचा सरकारला घरचा आहेर

नवी दिल्ली दि.२ (वृत्तसंस्था)- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी त्यांच्या रोखठोक स्वभावामुळे सर्वपरिचित आहेत. त्याशिवाय त्यांच्या विविध उपक्रमांबाबतच्या संकल्पनाही चर्चेचा विषय ठरतात. या गोष्टी मांडताना आपल्याच सरकारमधील चुकीच्या गोष्टींवर बोट ठेवण्यातही गडकरी मागेपुढे पाहात नाहीत. या पार्श्वभूमीवर सध्या पंजाब, हरियाणातील शेतकऱ्यांनी दिल्लीच्या सीमारेषांवर छेडलेल्या आंदोलनाबाबत नितीन गडकरींनी 'लल्लनटॉप'ला दिलेल्या मुलाखतीत भूमिका



मांडली आहे. त्यात देशातला शेतकरी, मजूर, गरीब आज दुःखी असल्याचं गडकरी म्हणाले आहेत. काँग्रेसनं यासंदर्भातला व्हिडीओ शेअर केला आहे.

शेतकरी आंदोलनाबाबत नितीन गडकरींना प्रश्न विचारला असता त्यांनी त्यावर स्पष्टीकरण दिलं. 'तांदूळ, मका, साखर, गव्हाचं अतिरिक्त उत्पादन हा मुद्दा महत्त्वाचा आहे. हरियाणामध्ये तर गहू आणि तांदूळ ठेवण्यासाठी रेल्वेचे प्लॅटफॉर्म वापरावे लागले. आपल्याकडे साठवणुकीची पुरेशी व्यवस्था नाहीये', असं नितीन गडकरी यावेळी म्हणाले.

'शेती उत्पादनांचा भाव मागणी व पुरवठ्यानुसार ठरतो. पण आपल्याकडे धान्याच्या किमतींमध्ये फारसे बदल होत नाहीत. त्यामुळे शेती आर्थिकदृष्ट्या परवडेनाशी झाली. माझ्या आयुष्याचं ध्येय हे आहे आहे की या देशाचा शेतकरी फक्त अन्नदाता नसून ऊर्जा उत्पादकही व्हावा', अशी भूमिका गडकरींनी मांडली.

## फडणवीसांनी पवारांचे जेवणाचे निमंत्रण नाकारले

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- नमो रोजगार मेळाव्याच्या निमित्ताने बारामतीमध्ये येणाऱ्या राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना शरद पवारांनी निमंत्रण दिलं होतं, पण व्यस्ततेच्या कारणामुळे आपल्याला हे शक्य होणार नसल्याचं सांगत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी हे निमंत्रण नाकारलं आहे. त्या संबंधित त्यांनी एक पत्रही शरद पवारांना लिहंलं असून त्यांचे आभारही मानले आहेत. सोबतच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवारांनीही नियोजित कार्यक्रमांच्या व्यस्ततेमुळे निमंत्रण नाकारल्याची माहिती आहे.

## शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना लागू, मुख्यमंत्र्यांची घोषणा

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीतील (एनपीएस) बाजारामधील चढ-उतारामुळे निर्माण होणारी गुंतवणूक विषयी जोखीम राज्य शासन स्वीकारेल असे जाहीर करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचारी-अधिकाऱ्यांसाठी सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना लागू करण्याचा निर्णय आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात जाहीर केला. या निर्णयानुसार कर्मचाऱ्यांनी विकल्प दिल्यास त्यांना शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के इतके निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई भत्ता वाढ, तसेच निवृत्तिवेतनाच्या ६० टक्के इतके कुटूंब निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई भत्ता वाढ मिळणार आहे.

'हा निर्णय लाखो कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या उज्ज्वल भविष्याच्या दृष्टीनं महत्वाचा आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दृष्टीनंही हितकारक ठरेल,असा विश्वास मुख्यमंत्री यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच कर्मचारी संघटनांना दिलेला शब्द पाळल्याचेही नमूद केले. राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना सुधारीत करण्यासाठी नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालावर अभ्यास केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

## मोदींनी फडणवीसांना थांबवावे, मनोज जरांगे यांच्याकडून विनंती

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षणाच्या देण्याची मागणी करत पुन्हा एकदा मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे. 'मराठा आमदार, मंत्र्यांकडून फडणवीसांना मराठ्यांची जिरवायची आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाहा यांना माझी विनंती आहे की, फडणवीस मराठा समाजावर दडपशाही करायला लागले आहे. त्यांना थांबवा अन्यथा आम्हाला नाईलाजाने न्यायालयात जावे लागेल,' असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

पुढे बोलतांना जरांगे म्हणाले की, ' फडणवीस म्हणतात ना मला गुतवायच आहे, तर गुतुद्या, कालपासून मराठ्यांनी तालुक्या तालुक्यात बैठका घेणे सुरू केले आहे. मराठ्यांची नाराजीची लाट अंगावर घेऊ नका, अजूनही वेळ गेलेली नाही. फडणवीस साहेब आमचे मराठे अमच्याच अंगावर घालू नका, मराठ्यांवर चाल करून येऊ नका, पूर्वी चाल करायचे आता तसे करू नका' असे जरांगे म्हणाले.

देवेंद्र फडणवीस तुम्हाला माझी विनंती आहे, आमचं तुमचं शत्रुत्व नाही. ठरलेल्या मागण्या मान्य करा. आंतरवाली येथे संचारबंदी लावण्यासाठी आता काय झालं, का दडपण आणत आहात. आंतरवाली येथील संचार बंदी उठवा. संचारबंदी लावून दडपशाही, गुंडगिरी करण्यासाठी पद दिलेलं नाही. जर तुम्ही शांत केले नाही, तर तुमच्यावरील विश्वास देखील तुटेल. गृहमंत्री असा नसावा, जो दडपशाही करून गुंडगिरी करतो. त्यांच्या (फडणवीस) मनात मराठ्याविषयी खुन्नस आहे, असेही जरांगे म्हणाले आहेत.

## स्वबळावर लढल्यास ६ जागा जिंकू-प्रकाश आंबेडकर

नागपूर दि.१ (प्रतिनिधी)- आगामी लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने स्वतंत्रपणे लढायचे ठरवल्यास आम्ही किमान ६ जागांवर जिंकू, असा ठाम दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला. आम्ही महाविकास आघाडीसोबत चर्चेचे दरवाजे शेवटपर्यंत उघडे ठेवू. पण युती न झाल्यास आम्ही ज्या जागा लढणार होतो, त्याची यादी आमच्याकडे तयार आहे, असे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले. ते शुक्रवारी नागपूरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

यावेळी प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीकडून लोकसभा जागावाटपाच्या चर्चेत सहभागी करुन घेत जात नसल्याबद्दल जाहीरपणे नाराजी बोलून दाखवली. आम्ही लोकसभा जागावाटपाच्या चर्चेत उपरे आहोत. त्यांची चर्चा झाली की ते आम्हाला बोलवतात. पण आम्ही शेवटपर्यंत चर्चेत सहभागी होण्याचा आग्रह धरणार आहोत. मला सध्या जे काही दिसत आहे त्यावरुन महाविकास आघाडीत काँग्रेस आणि शिवसेना यांच्यात घमासान युद्ध सुरु आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्या दोघांमधील वाद संपला की वंचितचा उपरेपणा संपेल, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले.

## विधीमंडळाच्या लॉबीमध्ये शिंदे गटाच्या आमदारांमध्ये राडा

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- विधीमंडळाच्या लॉबीत शिंदे गटाच्या आमदारांमध्ये राडा झाल्याची माहिती समोर आली आहे. शिंदे गटाचे मंत्री दादा भुसे आणि आमदार महेंद्र थोरवे यांनी एकमेंकांना धक्काबुक्की केली. विधीमंडळाच्या लॉबीमध्येच हा राडा झाला. यानंतर शंभुराज देसाई आणि भरत गोगावले यांना यामध्ये मध्यस्थी करावी लागली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सभागृहामध्ये आले होते, त्यावेळी शिवसेना प्रवक्ते भरत गोगावले आणि इतर शिंदे गटातले आमदार त्यांच्यासोबत होते. त्यानंतर मुख्यमंत्री सभागृहामध्ये गेले, त्यावेळी लॉबीमध्ये महेंद्र थोरवे आणि दादा भुसे यांच्यामध्येही धक्काबुक्की झाल्याची माहिती समोर आली आहे. कोणत्या कारणावरून हा वाद झाला हे अद्याप समजू शकलेलं नाही. मात्र ज्या पद्धतीचा वाद या एकाच पक्षातील दोन नेत्यांमध्ये झाल्याचं समोर आलेलं आहे, यावरुन राजकीय वर्तुळात पक्षांतर्गत कलहाच्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

आमदारांमध्ये अशा पद्धतीची धक्काबुक्की होणं आणि तेही एकाच पक्षातल्या आमदारांमध्ये होणं, हे खरंतर महायुची सरकारमधली अशी एक पहिलीच आणि एक मोठी घटना आहे. या घटनेच्या अनुषंगानं जर आपण पाहायला गेलं, तर मागच्या अनेक दिवसांपासून ज्या पद्धतीनं वेगवेगळे वाद, या सर्व आमदारांमध्ये होताना पाहायला मिळत आहेत, त्यावरुन पक्षांतर्गत कलह तर नाही ना, असा देखील प्रश्न या निमित्तानं उपस्थित होत आहे. मात्र ही जी वादावादी आहे, ती लॉबीमध्ये पार पडली आणि त्यावेळी त्या ठिकाणी उपस्थित असणारे भरत गोगावले आणि मंत्री शंभूराजे देसाई यांनी मध्यस्थी करत महेंद्र थोरवे आणि दादा भुसे यांना थांबण्याचा प्रयत्न केला.

## राहुल नार्वेकरांच्या आदेशाविरोधातील ठाकरे गटाच्या याचिकेवर सुप्रीम कोर्टात ७ मार्चला सुनावणी

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसंस्था)- महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या आदेशाविरोधात उद्धव ठाकरे गटाची याचिका सर्वोच्च न्यायालयात ७ मार्च रोजी सूचीबद्ध होणार आहे. या प्रकरणाची सुनावणी ७ मार्च रोजी करणार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. राहुल नार्वेकर यांनी जून २०२२ मध्ये पक्ष फुटल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना गटालाच खरा राजकीय पक्ष म्हणून घोषित केले होते. ठाकरे गटाच्या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती डी.वाय. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर १ मार्च रोजी सुनावणी होणार होती.

ठाकरे गटातर्फे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी याचिकेचा संदर्भ दिला आणि आज सुनावणी होणाऱ्या खटल्यांच्या यादीत नसल्याचे सांगितले. खंडपीठात न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांचाही समावेश आहे. त्यांनी खंडपीठाला ७ मार्च रोजी या सूचित करण्यास सांगितले. सरन्यायाधीशांनी ७ मार्च रोजी सुनावणी होणार असल्याचे सांगितले. खंडपीठाने कामकाज लवकर संपणार असल्याने१ मार्च रोजी ज्या खटल्यांची यादी करण्यात येणार होती ती अनेक प्रकरणे या यादीत समाविष्ट होऊ शकली नसल्याचेही ते म्हणाले.

## भाजपकडून उद्धव ठाकरेंवर जाळे फेकण्याचे काम-संजय राऊत

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- भारतीय जनता पक्षाचे अनेक प्रमुख नेते आता उद्धव ठाकरे यांच्यावर जाळे फेकण्याचे काम करत असल्याचा आरोप खासदार संजय राऊत यांनी केला आहे. आपण परत एकदा एकत्र येऊन बसू, आमच्या चुका झाल्या, परत बसू असा ते प्रयत्न करत आहेत. मात्र, आम्ही त्या संदर्भात रिॲक्शन देत नाही. सध्या आम्ही महाविकास आघाडीमध्ये काम करतोय. आणि आम्ही शेवटपर्यंत महाविकास आघाडीसोबत राहणार आहोत. जरा आम्ही सातत्याने नितेश कुमार यांच्याप्रमाणे पलटी मारली, तर आमच्यावर कोण विश्वास ठेवेल? लोकांचा विश्वास जास्त महत्त्वाचा आहे. त्यामुळे घेतलेला विचार अर्धवट सोडून जाणार नसल्याचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे.

भाजपसोबत २५ वर्षे आम्ही होतो. त्यांनीच आमचा पक्ष फोडला. आमच्या लोकांना नादाला लावले, पण नादाला लावलेले लोक फार काळ टिकत नसतात. ते या तमाशातून त्या तमाशात जातात. मात्र आम्हाला त्यांच्याकडे जायची गरज नसल्याचं संजय राऊत यांनी म्हणाले आहे. एका खासगी वृत्तवाहिनीच्या वतीने लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित कार्यक्रमात संजय राऊत यांनी सध्याच्या राजकारणावर जोरदार हल्ला चढवला. उद्धव ठाकरे आणि संजय राऊत हे वेगवेगळे नाहीत, हे सर्वांना माहिती आहे. उद्धव ठाकरे यांचं नेतृत्व हे लोक भावनेचा आदर करणारे आहे. राज्याची लोक भावना शिवसेनेच्या पाठीशी असल्याचा दावा संजय राऊत यांनी केला आहे. आमच्यावर ज्यांनी ही वेळ आणली त्यांच्या सोबत जाण्याएवढे आम्ही नालायक नसल्याचे संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

## बंगळुरूच्या कॅफेत आयईडी स्फोटात ९ जण जखमी

बंगळुरू दि.१ (वृत्तसंस्था)- बंगळुरूमधील प्रसिद्ध रामेश्वरम कॅफेमध्ये शुक्रवारी दुपारी एकच्या सुमारास स्फोट झाला. या घटनेत कॅफेचे ३ कर्मचारी आणि २ ग्राहकांसह ९ जण जखमी झाले आहेत. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ते धोक्याबाहेर आहेत. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी बॉम्बस्फोटाला दुजोरा दिला आहे. हा कमी तीव्रतेचा स्फोट असल्याचे त्यांनी सांगितले. एका व्यक्तीने कॅफेमध्ये बॅग सोडली, त्यानंतर स्फोट झाला.

घटनेची माहिती मिळताच पोलीस, बॉम्बशोधक पथक, फॉरेन्सिक आणि एनआयएची टीमही तपासासाठी घटनास्थळी पोहोचली आहे. पोलिसांनी सांगितले की, आम्ही घटनास्थळी पोहोचलो तेव्हा कॅफेच्या भिंतीवरील काच फुटून टेबलावर विखुरलेली होती. व्हाईटफिल्ड फायर स्टेशनच्या अधिकाऱ्याने सांगितले की, त्यांना कॅफेमध्ये सिलेंडरचा स्फोट झाल्याची माहिती मिळाली होती.

वृत्तानुसार, कॅफेमध्ये स्फोटाच्या ठिकाणी बॅटरी, एक जळालेली बॅग आणि काही ओळखपत्रे सापडली आहेत. त्याआधारे बॉम्बस्फोटाचा कट असल्याचाही अंदाज वर्तवला जात आहे. राज्याचे गृहमंत्री म्हणाले- बसण्याच्या जागेत स्फोट झाला आणि तेथे सिलिंडर नव्हता. या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# उत्तम मार्गदर्शन गरजेचे

विद्यार्थी अभ्यासाकडे दुर्लक्ष करतोय असं पालकांच्या लक्षात आलं तर, त्याची रुची वाढावी, यासाठी पालकांनी स्वत:हून प्रयत्न करून पाल्याला सकारात्मक मार्गानं समजावून सांगणं अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण कोणतेही पालक हे मुलांचे पहिले गुरू, शिक्षक, मार्गदर्शक असतात. विद्यार्थी अभ्यासाकडे दुर्लक्ष करतोय असं पालकांच्या लक्षात आलं तर, त्याची रुची वाढावी, यासाठी पालकांनी स्वत:हून प्रयत्न करून पाल्याला सकारात्मक मार्गानं समजावून सांगणं अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण कोणतेही पालक हे मुलांचे पहिले गुरू, शिक्षक, मार्गदर्शक असतात. याचं भान ठेवून प्रत्येक पालकानं आपल्या पाल्याला योग्य मार्ग दाखवला तर त्याचा फायदा आपल्याच पुढच्या पिढीला होणारच.

एका कार्यक्रमात संगीतकार अमितराज यांनी आदेश बांदेकर यांचे जाहीर आभार मानले. याचं कारण सांगताना त्यांनी खुलासा केला होता की, ''माझे आई-वडील दोघेही सरकारी नोकरीत. त्यामुळे साहजिकच मीसुद्धा सरकारी नोकरीत जावं असं पालकांना वाटत होतं. मात्र माझं मन संगीत क्षेत्रात करिअर करण्यासाठी ओढ घेत होतं. त्यामुळे घरात कायम संघर्ष सुरू होता. नेमकं त्याच काळात माझ्या आईची आदेश दादाबरोबर भेट झाली. तिनं सगळी परिस्थिती दादाच्या कानावर घातली. त्यावर दादानं आईला सांगितलं होतं की मुलाच्या परीक्षेतल्या गुणांपेक्षा त्याच्या अंगी असणाऱ्या गुणांना जास्त महत्त्व द्या. त्यामुळे त्याच्या मनासारखं करिअर घडेल. तुमचा पाठिंबा कायम ठेवा.

दादाच्या या उद्गारानंतर पालकांचा विरोध कायमचा मावळला.'' हा किस्सा ऐकताना नकळतपणे माझ्या अनेक विद्यार्थ्यांचे चेहरे त्यांच्या पालकांसह डोळ्यांसमोर तरळले. घरातल्यांचा पाठिबा नसेल तर प्रसारमाध्यमात काम करणं किती अवघड आहे, याचा अनुभव अनेक विद्यार्थ्यांनी घेतला आहे. आपल्या पाल्यानं आयुष्यात कोण व्हावं, याचा विचार अनेकदा पालकच करताना दिसतात. पाल्य संशोधक, संगीतकार, गायक, खेळाडू, कलाकार होऊन कितीसे पैसे मिळणार आहेत? त्यापेक्षा डॉक्टर, इंजिनीअर व्हावे, नेहमी गुणवत्ता यादीत यावे, परदेशात जाऊन भरपूर पैसे मिळवावेत, शक्य असेल तर कायमस्वरूपी परदेशातच स्थायिक व्हावे अशीच अनेक पालकांची तीव्र इच्छा असते. त्यांच्या दृष्टीने असं आयुष्य म्हणजे सुखी आणि यशस्वी जीवन. आपल्या पाल्यानं नियमित अभ्यास करावा, प्रत्येक परीक्षेत प्रत्येक विषयात उत्तम गुण मिळावेत, सर्व विषय त्याला उत्तमरीत्या कळावेत अशी अपेक्षा सर्वच पालकांची असते. ही अपेक्षा महाविद्यालयात शिक्षकांकडून पूर्ण व्हाव्यात अशीही पालकांची इच्छा असते. अपेक्षा ठेवणं चुकीचं नाही; मात्र या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी पालकांचाही सहभाग, त्यांचे सहकार्य असणं गरजेचं असतं याकडे सोयीस्कररीत्या दुर्लक्ष केलं जातं.

महाविद्यालयांमध्ये प्रत्येक वर्गात असणारी विद्यार्थी संख्या ही दरवर्षी वाढणारी आहे. शिक्षकांना अनेक वर्गामध्ये अनेक विद्यार्थ्यांना शिकवायचं असतं. नेमक्या काळात अभ्यासक्रम पूर्ण करायचा असतो. परीक्षा घेणं, पेपर तपासणं, निकाल तयार करणं, स्नेहसंमेलन, सहली या सगळ्यात इच्छा असूनही शिक्षकांना प्रत्येक विद्यार्थ्यांकडं लक्ष देता येत नाही. यासाठीच पालकांचाही पाल्याच्या प्रगतीत हातभार लागणं आवश्यक आहे. मात्र हा हातभार सकारात्मक असणं अत्यंत गरजेचं आहे. मराठी बीएमएमच्या वर्गात एक विद्यार्थिनी अत्यंत बोलकी. उत्तम अँकर, सूत्रसंचालक होण्याचे गुण तिच्यात होते. मराठी भाषेवर उत्तम पकड. त्यामुळे 'तू अँकर हो' असाच माझा आग्रह होता. ती विद्यार्थिनीही मेहनतीसाठी तयार होती. मात्र वडिलांचा या सगळ्याला विरोध होता. मुळातच बीएमएमला प्रवेश घेण्यालाच त्यांचा विरोध होता. या विरोधाला न जुमानता तिने हट्टानं प्रवेश घेतला. शिक्षण पूर्ण केलं. मात्र शिक्षणानंतर घरीच बसली. आजही ही विद्यार्थिनी फोन करते, तेव्हा प्रसारमाध्यमे एका उत्कृष्ट वृत्तनिवेदिकेला मुकल्याची जाणीव तीव्र होते. तिच्या वडिलांनी आपण का समजावू शकलो नाही, याचा पश्चाताप मला आयुष्यभर राहणार हे नक्की. याउलट अनुभव दुसऱ्या एका विद्यार्थिच्या बाबतीत आला. आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा. लहानपणापासून कोणत्याही गोष्टीला 'नाही' ऐकण्याची सवयच नाही. पालकही नको इतके पझेसिव्ह.

याचा परिणाम त्याच्या वर्तनात नेहमीच दिसून यायचा. याशिवाय प्रत्येक दोन-तीन दिवसांनी आई-वडील दोघेही शिक्षकांना भेटून शैक्षणिक प्रगतीचा आढावा घ्यायचे. महाविद्यालयीन आयुष्यात रंगीबेरंगी दिवसांचा आस्वाद घेण्याऐवजी हा विद्यार्थी काहीसा तणावग्रस्त राहात होता. शेवटी त्याच्या आई-वडिलांचेच समुपदेशन करावं लागलं. त्यानंतर मात्र खूपच सकारात्मक फरक पालक-पाल्यात दिसून आला. असे अपवाद हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच. पाल्य किंवा विद्यार्थी लहानपणापासूनच ज्या परिवारात, ज्या वातावरणात वाढतात त्याचा काही ना काही परिणाम त्यांच्यावर कळत नकळत होत असतात. म्हणूनच विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती होण्यासाठी घरातही पोषक वातावरण असणं आवश्यक असतं. शाळा, महाविद्यालयात जेवढा वेळ विद्यार्थी असतात त्यापेक्षा जास्त काळ ते आपल्या घरी असतात. म्हणूनच आई-वडिलांचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा आहे, घरातील इतर सदस्य शिक्षणाला किती महत्त्व देतात, पाल्याच्या शैक्षणिक विकासाकडे पालक सातत्यानं लक्ष देतात का, यासारख्या गोष्टींवरही विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती अवलंबून असते.

त्यामुळे पाल्याच्या अपयशासाठी एकटया शिक्षकांनाच दोषी मानता येणार नाही. पाल्याची शैक्षणिक प्रगती उत्तम हवी असेल तर, घरातच त्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. बीएमएमच्या विद्यार्थ्यांना ज्यावेळी वर्तमानपत्राच्या वाचनाचं महत्त्व समजावून सांगत असतो, त्यावेळी एक प्रश्न हमखास विचारतो की किती जणांच्या घरी आवर्जून वर्तमानपत्रं विकत घेतली जातात? उत्तर माहीत असलं तरी सत्य परिस्थिती आम्हाला काही प्रमाणात निराश करणारी असते. यावर उपाय म्हणून लायब्ररीत बसून वर्तमानपत्र वाचा, असा सल्ला आम्ही देतो. शिक्षक-पालक बैठकांमध्येही पालकांना समुपदेशन करण्याचं काम आम्हाला करावं लागतं; ते विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने विचार करून. अनेक विद्यार्थ्यांच्या घरी शिक्षणाला पोषक वातावरणच नसतं. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतही पालक विद्यार्थ्यांसाठी कर्ज काढून शिकवत असतात. अभ्यासासाठी वेगळी खोली, नवी कोरी पुस्तके यासारखी 'चैन' त्यांना परवडणारी नसते. अशा परिस्थितीत विद्यार्थी अभ्यास करताना तरी घरात तेवढा वेळ शांतता ठेवली जाईल, याकडे लक्ष द्या, असा सल्ला आम्ही देतो. याशिवाय त्याच्या अभ्यासातलं काही कळतच नाही, असं म्हणण्यापेक्षा तो काय शिकतोय, जे शिकतोय ते त्याला समजतंय का? अशी साधी चौकशीही त्या पाल्याला नवा हुरूप देते. अनेकदा जबरदस्ती करून, मागे लागून, शिक्षा करून आई-वडील विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी लावण्याचा प्रयत्न करतात. हा जुलमाचा रामराम काही काळ विद्यार्थी सहन करतात मात्र हळूहळू हा प्रवास बंडाच्या दिशेने वाटचाल करू लागतो. यापेक्षा विद्यार्थी अभ्यासाकडे दुर्लक्ष करतोय असं पालकांच्या लक्षात आलं तर, त्याची रुची वाढावी, यासाठी पालकांनी स्वत:हून प्रयत्न करून पाल्याला सकारात्मक मार्गानं समजावून सांगणं अत्यंत महत्त्वाचे आहे.

# अंमली पदार्थांवर अंकुश ठेवायचा तर...

**'सांस्कृतिक** राजधानी' अशी ओळख मिरवणाऱ्या पुण्यासारख्या शहरात अलीकडेच अमली पदार्थांचा मोठा साठा हस्तगत करण्यात आला. या कारवाईबद्दल पोलिसांचे कौतुक करायला हवेच, मात्र इतक्या राजरोसपणे असे देशविघातक कृत्य सुरू असते आणि ते संबंधित यंत्रणांच्या लक्षातही येत नाही, ही बाब मात्र न पटणारी आहे. आज देशातच नव्हे, तर जगभर व्यसनाधिनता वाढत असताना अशा गोष्टींवर अंकुश ठेवायलाच हवा.

अलीकडेच पुणे पोलिसांनी अमली पदार्थांचा मोठा साठा हस्तगत केला. त्याचे बाजारमूल्य सुमारे ३७०० कोटी रुपये असल्याचे निष्पन्न झाले. या घटनेच्या निमित्ताने एकूणच हा विषय ऐरणीवर आला असून, त्यावर गांभीर्याने चर्चा होण्याची गरज आहे. या सगळ्याचा सूत्रधार एक विदेशी पारपत्रधारक असून, त्याला काही वर्षांपूर्वीच नार्कोटिक्स ब्युरोने अटकही केली होती. अशी पार्श्वभूमी असणाऱ्या या व्यक्तीने पुन्हा एकदा भारतात प्रवेश केला आणि इथल्या काही उद्योजकांच्या मदतीने पुण्याजवळील कुरकुंभ येथील औद्योगिक वसाहतीमध्ये तयार अन्नघटक बनवण्याचा उद्योग सुरू केल्याचे भासवले. प्रत्यक्षात त्या ठिकाणी अमली पदार्थ मोठ्या प्रमाणावर तयार होत होते. नंतर मोठ्या प्रमाणात बाजार असणाऱ्या दिल्लीसारख्या ठिकाणी तो माल साठवला जात होता.

एवढेच नव्हे तर, हा माल इंग्लंडपर्यंत पाठविण्याचा उद्योगही सुरू होता. हे सगळे लक्षात घेता पुन्हा असे प्रकार होऊ नयेत, या हेतूने पुढील काळात काही खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे. त्यातील पहिली बाब म्हणजे पूर्वी अशा स्वरूपाची कारवाई ज्याच्यावर झाली आहे, अशा त्या विशिष्ट गुन्ह्याची पार्श्वभूमी असणाऱ्यांवर बारकाईने लक्ष ठेवणे गरजेचे आहे, कारण हे लोक शिक्षा भोगूनही पुन्हा पुन्हा त्याच त्याच प्रकारचे गुन्हे करत असतात. दुसरे म्हणजे अमली पदार्थांसंदर्भात कार्यरत असणाऱ्या वा तशी पार्श्वभूमी असणाऱ्या परदेशी व्यक्तींवर भारताच्या परराष्ट्र खात्याने, गृहखात्याने ते आपल्या देशात कधीही परत येणार नाहीत, या दृष्टीने उच्चायुक्त, दूतावास, विमानतळे अशा सर्व ठिकाणी तशा सूचना देणे गरजेचे आहे. हे लोक भारतात येऊन तेच गुन्हे करतात आणि देशाची सुरक्षा धोक्यात येते, म्हणूनच ही दक्षता घ्यायला हवी.

आज सुदैवाने सर्व विभागांमध्ये चांगल्या प्रकारची संपर्क यंत्रणा उपलब्ध आहे. त्याचा पूर्ण उपयोग करून घेत अशा गुन्हेगारांबद्दलची अद्ययावत माहिती सर्व संबंधितांना पोहोचली आहे की नाही, हे पाहणे गरजेचे आहे. तुरुंग विभागाकडून गुन्हेगार सुटण्याच्या माहितीचाही यात अंतर्भाव असावा. यामुळे तुरुंगात कोणता गुन्हेगार सुटला वा कोणता सुटणार आहे, त्याच्यावरील गुन्ह्याचे स्वरूप काय, हे संबंधित यंत्रणांना आधीच समजले तर योग्य ती खबरदारी घेणे शक्य होईल. विमानतळ, दूतावास आदी ठिकाणी ही माहिती पोहोचली तर विमानतळावरील अधिकारी त्यांचे काम करून गुन्हेगारांकडून होणाऱ्या देशविघातक कृत्यांना वेळीच पायबंद घालू शकतील.

देशात वा राज्यात इतक्या मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थ सापडण्याची ही काही पहिलीच घटना नाही. ठिकठिकाणच्या औद्योगिक वसाहतींमध्ये असे प्रकार पूर्वीही उघडकीस आले आहेत. एक म्हणजे या वसाहती मुख्य जिल्हा, गाव वा शहरांपासून दूरच्या भागात विकसित केल्या जातात. ओसाड प्रदेशातच एमआयडीसी काढल्या गेल्या आहेत. त्यामुळेच आजूबाजूला तशीही फारशी वस्ती नसते. साहजिकच एरवी फारशी वर्दळ नसणाऱ्या अशा भागांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना हव्या त्या देशविघातक कारवाया करण्यासाठी शासनाच्या मदतीने मोकळे रान मिळाले असल्यासारखे चित्र निर्माण होते.

खरे तर प्रत्येक औद्योगिक वसाहतीचे अधिकारी असतात, अन्न व औषधी प्रशासन अधिकारी असतात वा कायदा आणि सुव्यवस्थेची काळजी घेणारेही अधिकारी असतात. प्रत्येक औद्योगिक वसाहतीचे चेंबर ऑफ कॉमर्स असते. या सगळ्यांनी एकत्र येऊन आपल्या परिसरातील प्रत्येक उद्योजक काय करतो, याची सविस्तर चौकशी दर महिन्याला करणे गरजेचे आहे. आज ही चौकशी होत नसल्यामुळे या लोकांना मोकळे रान मिळाले असून, त्यातील काही ठिकाणे देशविघातक कृती करण्याची केंद्र झाली आहेत. त्यामुळेच आधी उल्लेख केल्याप्रमाणे औद्योगिक वसाहतींचे प्रमुख, उद्योग



सचिव, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक, प्रत्येक जिल्ह्यातील अधिकारी या सगळ्यांमध्ये समन्वय असण्याची आवश्यकता आहे. या अधिकाऱ्यांनी कोणत्या कारखान्यांना भेट दिली, तिथे काय सापडले, त्यात शंका घेण्यास जागा आहे का, या सगळ्यांबाबतची सविस्तर माहिती ऑनलाइन पद्धतीने मंत्रालय, पोलीस महासंचालक आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांकडे वेळच्या वेळी पाठविली, तर मोठे धोके टाळणे सहज शक्य होईल.

बरेचदा अशा धंद्यांमध्ये वा अमली पदार्थांच्या उत्पादनामध्ये अनेकांचा सहभाग असूनही ही माहिती सहजासहजी बाहेर पडताना दिसत नाही. येथे यामागील कारणांची मीमांसाही व्हायला हवी. त्यातील पहिली बाब म्हणजे या कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या लोकांना भरपूर पैसे दिले जातात. साहजिकच ठरावीक टक्केदारी दिली आणि पैशाची चटक लावली की, तयार मालाचे पुढे काय होते, याच्याशी त्यांना काहीही देणे-घेणे राहत नाही. खेरीज आपण एखादी देशविघातक गोष्ट करत आहोत, हे त्यातील काहींना कळतही नाही. म्हणजेच हे काम सगळे जाणूनबुजून करतात असेही म्हणता येत नाही. साहजिकच यातून देशाचे काय आणि किती नुकसान होणार आहे, हे खूप थोड्या लोकांना ठाऊक असते. या पूर्ण चेनमध्ये बरेच भाग असतात. त्यामुळेही याचा दोष सगळ्यांकडे जात नाही. मात्र, येथे काही गैरव्यवहार होत नाही ना, हे पाहण्याची जबाबदारी असणाऱ्यांवर मात्र दुर्लक्ष केल्याच्या कारणाखातर शासनाने कारवाई करणे गरजेचे आहे.

एका बाजूला मी पुणे पोलिसांच्या कारवाईबद्दल समाधान व्यक्त करून त्यांचे अभिनंदन करीन, पण त्याचबरोबर संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करण्याचा आग्रहही धरेन. कोणीही पुढे अशा प्रकारचे दुर्लक्ष करण्यास धजावणार नाही यासाठीची यंत्रणा निर्माण करणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, अशा भागांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा उभारणे शक्य आहे. नेटवर्किंगमधून महत्त्वाची माहिती मिळू शकते. उपलब्ध तंत्रज्ञानाचा फायदा घ्यायला हवा. असे गैरव्यवहार काही एका दिवसात झालेले नसतात. गेली काही महिनेच नव्हे, तर वर्षानुवर्षे ते सुरू आहेत. त्यामुळेच याची जबाबदारी झटकणे देशासाठी योग्य नाही. यामुळे देशाच्या सुरक्षेचाच नव्हे तर आंतरराष्ट्रीय सुरक्षेचाही प्रश्न निर्माण होतो.

आज आंतरराष्ट्रीय पातळीवरून अमली पदार्थ्यांच्या खरेदी-विक्री व्यवहारांची दखल घेतली जात असली, तरी हे खूप मोठे मार्केट असल्याचे नाकारून चालणार नाही. इंग्लंड, युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलियासारख्या विकसित म्हटल्या जाणाऱ्या देशांमध्येच आज ड्रग्जचा प्रचंड प्रमाणात खप होतो आहे. येथे त्यांना मोठ्या प्रमाणात मागणी आहे. त्यामुळेच यावरही बारकाईने लक्ष ठेवून, त्यांच्याकडे असणारी माहिती जाणून भारतातून त्यांना मदत करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे शस्त्र परजायला हवे.

कितीही कठोर कायदे केले तरी गुन्हेगार अनेक पळवाटा शोधत असतात. अमली पदार्थांची तस्करी करणारेही अनेक मार्गांनी देशविघातक कृत्ये करत असतात. त्यासाठी अनेक चांगल्या योजनांचा गैरवापरही केला जातो. वारंवार होणाऱ्या तपासण्यांमुळे याला आळा घालणे शक्य होईल. दुसरे म्हणजे सध्या घराघरांत नवरा-बायको कामानिमित्त बाहेर पडतात. साहजिकच मुलांकडे, त्यांच्या सवयींकडे, वागण्यातील बदलांकडे तितकेसे लक्ष जातेच असे नाही. अलीकडेच नाशिकमध्ये घडलेली एक घटना हे सत्य समोर मांडणारी आहे. तिथे एका शाळेत चौदा वर्षांच्या मुलीकडे ई सिगारेट सापडली. साहजिकच मुख्याध्यापकांनी तिच्या पालकांना ही बाब कळवली. हे मुलीला समजल्यानंतर तिने आत्महत्या केली. म्हणजेच नाशिकसारख्या ठिकाणी एखादी चौदा वर्षांची मुलगी व्यसनाच्या इतक्या आहारी गेली असेल, तर वास्तव किती भीषण आहे हे आपण समजून घ्यायला हवे. ड्रग्जचे लोण किती खोलवर पोहोचले आहे हे जाणून वेळीच लक्ष दिले तर हा प्रश्न काही अंशी नियंत्रणात राहू शकेल. बरेचदा आपले मूल व्यसनाधिन झाले आहे, हे पालक मान्यच करत नाहीत. मुलांनी पैसे चोरण्याच्या घटनेकडेही आज-काल दुर्लक्ष होताना दिसते. ही बाबही धोक्याची आहे. म्हणूनच प्रत्येक पालकाने जागरूक राहणे गरजेचे आहे.

अफगाणिस्तान, पाकिस्तान वा म्यानमारसारख्या देशांमधून अमली पदार्थांच्या पुरवठ्याद्वारे एक प्रकारचे छुपे युद्ध खेळले जात आहे. त्यामुळेच कधी काश्मीर, पंजाब, गुजरात, मणिपूर तर कधी महाराष्ट्रसारख्या भागात मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांचे साठे सापडतात. गेली तीस वर्षे पाकिस्तान ड्रोन, बोटी, सुरुंग, स्त्रिया आदींच्या मदतीने भारतात अमली पदार्थ पोहोचवत आहे. हे लक्षात घेऊन ड्रग्ज विरोधातील ही लढाई भारत-पाकिस्तान वा भारत-अफगाणिस्तानमधील लढाई इतक्याच गांभीर्याने घेण्याखेरीज पर्याय नाही. केवळ भारताच्या आजूबाजूच्या नव्हे तर अगदी दक्षिण अमेरिकेमधील काही देशांमध्येही प्रचंड प्रमाणावर अमली पदार्थांच्या निर्मितीसाठी आवश्यक मालाचे उत्पादन होते. हाच माल कंटेनरमध्ये भरून समुद्रमार्गे जगभर पोहोचवला जातो. तसाच तो भारतातही येतो आणि येथून अन्यत्र पोहोचवला जातो. त्यामुळे यावरही काळजीपूर्वक लक्ष ठेवून दोषींवर कारवाई करणे गरजेचे आहे. तरच पुढची पिढी या संकटापासून सुरक्षित राहू शकेल.

**- प्रवीण दीक्षित**
निवृत्त पोलीस महासंचालक

# कुटुंबाला भोवते आहे वैचारिक दारिद्र्य

**समुपदेशनाच्या** अनेक प्रकारच्या केसेस सोडवताना, स्त्री, पुरुष, मुलं, कुटुंबातील अन्य व्यक्ती यांच्याशी सखोल चर्चा करताना काही बाबी प्रकर्षाने जाणवतात. केसच्या आनुषंगाने पती — पत्नी, मुले यांच्याशी तर बोलावे लागतेच पण त्याही पलीकडे जावून जेव्हा आपण त्यांनी सांगितलेल्या माहितीच्या आधारे, त्यांना होत असलेला घरातील इतर व्यक्तींचा त्रास लक्षात घेऊन, त्यांच्या घरातील इतर नातेवाईक अथवा लोकांशी चर्चा करतो तेव्हा लक्षात येते की, कुटुंब विस्कळीत व्हायला कारणीभूत ठरते ती घरातील लोकांची कमकुवत विचार शैली, उथळ स्वभाव, अर्धवट ज्ञान, इतरांबद्दल मत बनविण्याची घाई, अति राग, अति द्वेष, मत्सर, जळाऊ वृत्ती, तिरस्कार आणि सतत आपापसात केलेली तुलना. स्वतःच्या अनुभवातून मत बनवणे, निर्णय घेणे, परिस्थितीचा सर्वांगीण अभ्यास करणे, दुसऱ्याचे ऐकून घ्यायला कमीपणा वाटणे, वास्तवापेक्षा ऐकिव माहितीवर पटकन विश्वास ठेवून खोट्या चुकीच्या वृत्तींना अधिक फोफावण्यासाठी खतपाणी घालणे.

सून नांदायला येत नाही, अशी तक्रार घेऊन जेव्हा सासू, नणंद अथवा नवरा येतो तेव्हा तिच्या अगणित चुकांचा पाढा वाचून दाखवला जातो. तिच्यामध्ये अनेक खोड्या काढून ती कशी आणि किती वाईट आहे हे सगळे सांगितले जाते. मग सून जर इतकी वाईट आहे हे तुम्ही स्वतः सांगताय, ठरवताय तर तुम्हाला ती परत नांदायला कशाला हवी आहे? परत तिला का बोलवायचे आहे? यालाच आपण वैचारिक दिवाळखोरी म्हणू शकतो. ज्या केसमध्ये पत्नी नवऱ्याची तक्रार सांगते त्यावेळी त्याचे सर्व अवगुणच सांगते. त्याच्यापासून होणारा त्रासच सांगते. त्याच्यात एकही चांगला गुण नसेल का की तो तुम्ही अभिमानाने सांगू शकता? मग असा इतका दुर्गुणी माणूस तुम्ही नवरा म्हणून का निवडला? की लग्न झाल्यावर तो इतका नालायक सिद्ध झाला?

कौटुंबिक समस्या सोडवताना प्रकर्षाने जाणवणारा मुद्दा असतो घरातील लोकांनी एकमेकांना माघारी बोलणे आणि त्यातून निर्माण झालेला प्रचंड मोठा वैचारिक गुंता. आपण केस संदर्भात काहीही माहिती विचारल्यास लोकांची उत्तरे असतात तो म्हणत होता, ती सांगत होती, यांच्याकडून समजले, हा बोलला, तो बोलला, माझ्या कानावर आले. लोकांकडे फक्त ऐकीव डाटा उपलब्ध असतो हा डाटा खरा किती, खोटा किती याबद्दल त्यांना स्वतःलाच माहीत नसते. ऐकीव माहितीच्या आधारित सर्व अवलोकन केलेले असते. बरं तो डाटा म्हणजेच माहिती पण सुसंगत सुसूत्र असते असे नाही तर ती दहा ठिकाणावरून मिळालेली असते.

घरातीलच लोकांकडे एकमेकांबद्दल असलेल्या कोणत्याही माहितीला काहीही सबळ पुरावा, काही ठोस पार्श्वभूमी नसते, कोणत्याही वाक्याला गांभीर्य नसते. घरातील अत्यंत महत्त्वाच्या, संवेदनशील, तातडीच्या, भविष्यात त्रासदायक ठरणाऱ्या विषयावर काय कशी भूमिका घेणे योग्य राहील याबद्दल थोडा सुद्धा विचार कोणीही केलेला नसतो. घरातील आर्थिक व्यवहार, आर्थिक जबाबदाऱ्या, मुलांचे भवितव्य, आजारपण, घरातील लोकांची आर्थिक बचत यांमध्ये कुठलेही गांभीर्य नसते. त्यामुळे कोणतीही आर्थिक समस्या उभी राहिल्यावर एकमेकांना दोष देणे, हात वर करणे असे प्रकार घडतात.

एकमेकांबद्दल बोलणे, दोष देणे, आरोप करणे, कोणाची बदनामी करणे यात पूर्ण आयुष्य गेलेली व्यक्ती उतार वयात सुद्धा बदललेली नसते हे पाहून सुद्धा आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. अनेक ज्येष्ठ, साठी ओलांडलेले लोक सुद्धा बिनबुडाचे विधान करताना दिसतात. स्वतःच्या चुकांना स्वीकारताना त्यांना कमीपणा वाटतो. एकाच घरातील लोक एकमेकांना किती खालच्या दर्जाचे बोलू शकतात, कसे अपशब्द वापरू शकतात, घरातच लोकांना आपापसात आदर नाही हे पाहिल्यावर जाणवते की यांना अजून आयुष्याची संकल्पनाच समजली नाही. आपल्याच माणसांबद्दल जर आपणच इतके पातळी सोडून बोललो आणि वागलो तर आपले शिक्षण, संस्कार, सुसंस्कृतपणा, पैसा, श्रीमंती आणि बडेजाव सगळे व्यर्थ आहे हेच लोकांना समजत नाही.

अनेक सुशिक्षित कुटुंबे अनेक कारणांनी उद्ध्वस्त होताना आपण बघतोय. कोणाचा कोणाशी ताळमेळ नसल्यासारखे, कोणालाच कोणाची किंमत नसल्याने, फक्त स्वतःला कसा त्रास होणार नाही हे पाहून अनेकजण चालत असतात. कुटुंबात कितीही गंभीर, बिकट समस्या असली तरी मी कसा बरोब्बर आहे, माझ्यामुळे काहीच घडलेले नाही, माझा काहीच संबंध नाही हे पटवून देण्याचा प्रयत्न करतात. स्वतःची बाजू सुरक्षित करण्यात, अलिप्त राहण्यात जर तुम्हाला धन्यता मानायची असेल, तर अशा लोकांनी कोणाबद्दल काहीच मत मांडणे योग्य नाही. तटस्थ भूमिका घ्यायची असेल, तर एकदमच शांत आणि गप्प राहणे अपेक्षित आहे. समस्या अंगावर घ्यायची नाही, समस्या सोडवायची नाही मग त्याबद्दल स्वतःचे ज्ञान का पाजळावे? हे लोकांना कळत नाही.

अनेक जण तर सोईनुसार नाती बदलतात. एखाद्या नवऱ्याने चांगले काही केले तर बहिणी म्हणतात आमचा भाऊ! त्याने काही चूक केली की सुनेला म्हणणार तुझा नवरा, तुला ताब्यात ठेवता आला नाही का? बाईची काही चूक झाली तर तिच्या सासरचे तसेच आहेत म्हणून ती तशी वागली असे बोलून माहेरचे मोकळे होतात. घरातील लहान मुलांना पण यात सोडे जात नाही. मुले कुठे चुकली की आईचे वळण, आईचे संस्कार असे बोलून बाप मोकळा होणार, त्याच मुलाने काही यश मिळवले तर मग मुलगा कोणाचा आहे शेवटी! असे बोलून बाप श्रेय लाटणार. सासू — सुनांच्या बाबतीत तर आजही तोच पारंपरिक सासुरवास नित्यनियमाने सुरू असल्याचे दिसते. सून कितीही सुशिक्षित, कामावणारी असली तरी आज देखील सुनेबद्दल केल्या जाणाऱ्या तक्रारी काही कमी होताना दिसत नाहीत. लग्नाला १५-२० वर्षे झाल्यावरही नणंद — भावजय यांच्यामध्ये सुसंवाद आणि विचारविनिमय याचा अभाव जाणवतोय. एकमेकींचा पाणउतारा करण्यापेक्षा आपण एकमेकींच्या आयुष्यातील कमतरता कशा भरून काढू, आपले घर पुढे कस नेऊ, आपल्या गुणांचा वापर करून घराला हातभार कसा लावता येईल यावर कोणीच बोलत नाही.

'जा मुली जा दिल्या घरी सुखी राहा', हा प्रत्येक मुलीला आईकडून दिला जाणारा मूलमंत्र आता काहीही झाले की, ताबडतोब पोलीस स्टेशनला जा या सल्ल्यात रूपांतरित झालेला दिसतो. अनेक कुटुंबातील वैचारिक दारिद्र्य इतकं विकोपाला गेलं आहे की प्रॉपर्टी, पैसा, वाटणी, हिस्सा यासाठी सर्व नातेसंबंध पायदळी तुडवले गेले आहेत. समुपदेशनला कोणत्याही स्वरूपाचा वाद आला की त्यामध्ये पैसा इस्टेट प्रॉपर्टी हा अग्रणीचा मुद्दा पुढे रेटला जातो. घरातली माणसे, त्यांच्यातील प्रेम, जिव्हाळा हा फक्त एकत्र फोटो काढून सामाजिक माध्यमात टाकण्याइतपत शिल्लक आहे असे वाटते.

आजमितीला समाजाची तसेच अनेक कुटुंबांची जी विदारक परिस्थिती झालेली आहे, विभक्त कुटुंब, घटस्फोट, विवाहबाह्यसंबंध, आत्महत्या, घात-पात, अपमृत्यू, ताण- तणावातून उद्भवणारे आजारपण, मानसिक आजरांचे वाढते स्वरूप, अपघात, व्यसनाधीनता, मुला-मुलींनी दिशाहीन होणे या सगळ्या गोष्टींना कारणीभूत घराघरातील मतभेद, वैचारिक दारिद्र्य, योग्य वेळी योग्य निर्णयशक्ती वापरण्याचा अभाव, कुटुंबाला एकत्रित ठेवण्यासाठी अपेक्षित असलेल्या दमदार नेतृत्वाचा आभाव. त्यामुळे या सगळ्याचा सर्वांगीण विचार करून आपण आपली संस्कृती, आपले कुटुंबं कसं जपायचं हे आता फक्त आपल्याच हातात आहे.

**- मीनाक्षी जगदाळे**

# शरद पवारांचे भोजन निमंत्रण नाट्य

**बारामती** येथे दोन मार्च रोजी होणाऱ्या शासकीय कार्यक्रमास माननीय मुख्यमंत्री ,उपमुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम ज्या शिक्षणसंस्थे च्या प्रांगणात होणार आहे ,त्याचे माननीय शरद पवार हे अध्यक्ष आहेत, आणि अध्यक्ष या नात्याने त्यांनी माननीय मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना भोजनाचे निमंत्रण दिले आहे. सर्वसाधारणपणे भोजनाचे निमंत्रण हे व्यक्तिगत असल्यामुळे खाजगीरीत्या देण्यात येते. मात्र राजकारणाचे मुकुटमणी असलेल्या शरद पवारांनी हे निमंत्रण योग्य पद्धतीने समाज माध्यमांवर येईल याची गेल्या दोन दिवसापासून काळजी आणि खात्रीही केली आहे! सामान्यतः वृत्तपत्रांना अशा प्रकारच्या बातम्यांमध्ये नेहमीच स्वारस्य असते आणि त्यामुळे चौकटीमध्ये या निमंत्रण संदर्भातील बातम्या वृत्तपत्रात येणे ही बाब फारशी आश्चर्याची नाही. या बातमीच्या निमित्ताने वेगवेगळे राजकीय तर्ककुतर्क, तसेच या निमंत्रणाचे वरवरचे आणि गर्भित अर्थ काढणे राजकीय पातळीवर सुरू आहे. लोकशाहीमध्ये हे अपेक्षितही आहे. सध्या ज्या पद्धतीने एका पक्षातून दुसऱ्या पक्षात जाणे सुरू आहे, त्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या बातम्या या राजकीय दृष्ट्या सनसनाटी ठरू शकतात. देशाच्या लोकशाही परंपरेचा विचार केल्यास गावात गेल्यानंतर पक्षाचा विचार न करता त्या गावातील प्रमुख राजकीय व्यक्तींच्या घरी जाऊन भेट घेणे (आणि नंतर ही भेट राजकीय स्वरूपाची नव्हती असे जाहीर करणे हे )सर्वसामान्य आहे.

अनेकदा राजकीय दृष्ट्या कट्टर मते असलेले राजकारणी परस्परांकडे भोजनासाठी जाणे ही देशातील राजकीय परंपरा आहे आणि यात काहीही वावगे नाही. व्यक्तिगत संबंध हे राजकारणापासून पूर्णपणे वेगळे असतात आणि असावेत. राजकीय मत भिन्नता असली तरी मनभेद नसावे असे लोकशाहीचे तत्व सांगते. अशा प्रकारच्या डिनर डिप्लोमसीची अनेक उदाहरणे इतिहासात आहेत. खुल्या आणि योग्य वातावरणात राजकीय मते बाजूला ठेवून देशाच्या विकासासाठी चर्चा करणे हे समृद्ध लोकशाहीचे उदाहरण आहे आणि त्यामुळे या भोजन निमंत्रणाचा कोणताही राजकीय अर्थ न काढता हे निमंत्रण म्हणजे भारतीय अतिथ्यशील परंपरेचा भाग आहे असे समजून या पद्धतीचे संबंध दृढ व्हावेत अशी आशा करावी. लोकसभेच्या येणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आणि त्यानंतर प्रचाराच्या निमित्ताने होणाऱ्या गदारोळाच्या पार्श्वभूमीवर या प्रकारची बिगर राजकीय भोजने ही लोकशाहीचे उत्तम उदाहरण ठरू शकते.




माननीय शरद पवार यांच्या भोजन निमंत्रणाचे अन्य अर्थ काढण्या ऐवजी अतिथ्यशील परंपरेचा तो भाग आहे एवढाच त्यातून अर्थ काढणे सोयीचे ठरेल.

**- डॉ. अभय मंडलिक**

# शेगावीचे संत श्रेष्ठ श्री. गजानन महाराज चरित्र पारायणाला ४०० पारायनार्थी



वैजापूर, दि. १ (प्रतिनिधी) - येत्या रविवार ३ मार्च रोजी शेगावीचे संत श्रेष्ठ गजानन महाराज यांचा प्रकट दिन आहे. या निमित्त वैजापूर येथे सूंदर गणपती मंदिर मित्र मंडळ व श्रीगजानन महाराज प्रकट दिन उत्सव समितीने श्री गजानन विजय या चरित्र ग्रंथाचे वाचन गुरुवार पासून आरंभ केले आहे. या पारायणसाठी शहर व पंचक्रोशीतील व ग्रामीण भागातील चारशेवर भक्त पारायण साठी बसलेले आहेत. या भक्तांना ग्रंथ मंडळान उपलब्ध करून दिलेले आहेत व यानिमित्ताने दररोज सायंकाळी सहा ते नऊ कीर्तन कार्यक्रम ही होत आहे. मंडळाच्या पारायण आयोजनाचे हे दहावे वर्ष आहे, संस्थापक अध्यक्ष काशीनाथशेठ आगाज, सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वश्री संतोष बोथरा, श्रावण चौधरी, अजय भुजबळ, राजू पुणे, श्याम पवार, गणेश धुमाळ, गोटीराम बिडवे, मिलिंद जंगम, सुरेश टेके, संतोष भगत, श्याम आगाज, निशिकांत पवार, प्रकाश शेलार, दीपक आहेर, अरुण आंबेकर कार्यक्रम यशस्वी करण्यास्तव परिश्रम घेत आहेत.

# मराठा सेवा संघच्या वतीने साहित्यक व समाज कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत सेवा गौरव पुरस्काराने सन्मानित



वैजापूर, दि. १ (प्रतिनिधी) - मराठवाडा विभागाचे जेष्ठ बालसाहित्यक व सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांना गुरुवार (ता. २९ फेब्रुवारी) रोजी राजमाता जिजाऊ मंदिर मराठा सेवा संघ छत्रपती संभाजीनगर येथे मराठा संघाचे विभागीय अध्यक्ष धनंजय पाटील,हभप बालाजी महाराज (कंधार), मराठा संघाचे जेष्ठ मार्गदर्शक विंग कमांडर टी.आर. जाधव, ॲड वैशाली कडू पाटील, शिवश्री राजीव खिल्लारे यांच्या हस्ते सेवा गौरव पुरस्कार देऊन त्यांच्या सामाजिक, साहित्यिक व पर्यावरण पूरक कार्याचा यथोचित गौरव करण्यात आला. या प्रसंगी वक्ते हभप बालाजी जाधव यांचे 'शिवचरित्र; प्रेरणेचा अखंड ऊर्जा स्त्रोत' या विषयावर शिवकालीन ध्येय, धोरणे व विद्यमान स्थितीतील ध्येय धोरणे या वास्तवावर परखड विचार व्यक्त करणारे व्याख्यान झाले. जाणते राजे, लोककल्याणकारी राजे शिव छत्रपती यांच्या जनकल्याणाचे अनेक ऐतिहासिक दाखले त्यांनी आपल्या व्याख्यानातून दिले.

शिवश्री धनंजय पाटील यांनी अध्यक्षीय समारोप केला.

या प्रसंगी जवळपास १५ पुरस्कार्थी याना त्यांच्या विविध क्षेत्रातील वैशिष्ट्यपूर्ण कार्यासाठी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# सरकारी नादुरुस्त रुग्ण वाहिका घेत आहेत, बाळ व बाळंतीणचे बळी

**प्राथमिक** आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी नसणे, रुग्णवाहिका नादुरुस्त असणे, बाळंतीण साठी पुरेशा सोयी, सुविधा नसणे, प्रसूती तज्ञ डॉक्टर असूनही, त्यानी बाळंतण करण्यास नकार देणे, सिझरिंग तज्ज्ञ डॉक्टर ही खाजगीत सिझरीग करतो परंतु सरकारी रुग्णालयात करत नाही, अशा प्रसूतीसाठी आलेल्या महिलेला, जिल्हा रुग्णालयात पाठविणे, पण त्यासाठी १०२ किंवा १०८ रुग्णवाहिका नादुरुस्त असणे किंवा चालक ठिकाणावर नसणे, अशा प्रकारचा फटका ग्रामीण व आदिवासी भागात राहणाऱ्या महिला व पुरुषांना बसत आहे. नुकतीच नंदुरबार जिल्ह्याच्या आदिवासी भागातील प्रसूती कळा येत असलेल्या महीलेला प्राथमिक केंद्रातुन तालुका ठिकाणी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्याची शिफारस झाली. मात्र रुग्णवाहिका नादुरुस्त असल्याने दुसरीकडून रुग्ण वाहिका आणली उशिरा झाला व महिला रस्त्यातच आंबूलान्स मध्ये महिलेची डिलिव्हरी झाली, तालुक्यातील वैद्यकीय अधिकारी यांनी जिल्हा रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला यातच महिला गतप्राण झाली. ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. राज्यात सर्व प्राथमिक केंद्र व उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयात सर्व सोयी असतांना वैद्यकीय अधिकारी यांच्या हलगर्जी व बेजबाबदारपणामुळे जर रुग्णाचे प्राणास धोका होत असेल तर महाराष्ट्रला पुरोगामी, विकसित महाराष्ट्र, आघाडीचा महाराष्ट्र म्हणता येईल काय? आम्ही रुग्णांचे प्राण वाचवू शकत नाही, अबूलन्स असून ती नादुरुस्त असणे, चालक नसणे या बाबी योग्य वाटत नाही, शासनाच्या आरोग्य खात्याने या गंभीर बाबींकडे अतिशय गांभीर्याने लक्ष देऊन यापुढे अशा घटना होणार याची या साठी संबधित आरोग्य खात्याला सूचना द्याव्यात.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

# ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांचा सर्वांगीण विकास करणार - ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन



मुंबई, दि. १(प्रतिनिधी) - ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांचा सर्वांगीण विकास करणार असल्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले.

अखिल भारतीय वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले व यांच्या समवेत सर्व ह. भ. प. महंत शिवाजी महाराज, लक्ष्मण दशरथ मेंगडे, परमेश्वर गणपत बोधले, लक्ष्मण् बाबुराव तकीक, विरुपाक्ष शिवाचार्य महास्वामी, राधाबाई ज्ञानोबा सानप यांच्यासह महाराष्ट्रातील अनेक संत महंत, कीर्तनकार आदिंनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन यांचा विधीमंडळात सत्कार केला व आभार व्यक्त केले.

ग्रामविकास विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या 'ब' वर्गातील तीर्थक्षेत्रांचा पायाभूत विकास होण्याकरिता शाश्वत वाढीव निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेला नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान मंजुरी देण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून तीर्थक्षेत्रांना सुमारे २००० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिला जात आहे. तसेच पर्यटन विभागामार्फत देखील प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत सुमारे १००० कोटी रुपयांचा निधी तीर्थक्षेत्रांच्या पर्यटन विकासासाठी उपलब्ध करुन दिला आहे.

प्रधानमंत्री नरेंद मोदी यांच्या 'भव्य काशी दिव्य काशी', बद्री केदार देवस्थान विकास, उज्जैन येथील महाकाल कॉरिडॉर, अयोध्यास्थित प्रभू श्रीराम जन्मभूमी मंदिर विकास या संकल्पनेच्या धर्तीवर महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील महत्वपूर्ण अशा 'ब' वर्गातील तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेस मंजुरी देण्यात आली. आता 'ब' वर्गातील तीर्थक्षेत्रांना दोन कोटी ऐवजी पाच कोटींचा विकासनिधी उपलब्ध होत आहे.

ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविक आणि यात्रेकरुंना विविध सोयीसुविधा पुरविणे आवश्यक आहे. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नामुळे या सोयीसुविधा पुरविणे शक्य होत नाही. म्हणून शासनाने ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी पाच कोटींचा निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय नागपूर येथे झालेल्या बैठकीत मंत्रिमंडळाने घेतला. १६ नोव्हेंबर २०१२ नंतर २ कोटी या मर्यादेत निधी मंजूर केलेल्या तिर्थक्षेत्रांना नविन प्रस्तावित निकषाप्रमाणे ३ कोटी इतका निधी मंजूर करण्यात येत आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी मंदिरापर्यंत रस्ते, पाणीपुरवठ्याची व्यवस्था करणे, स्वच्छतागृह, शौचालय, वाहनतळ, भक्त निवास, रस्त्यावरील दिवे आणि संरक्षण भिंत, वृक्ष लागवड करणे इत्यादी सुविधा या निधीतून उपलब्ध करुन दिल्या जातील.

### ४८० तीर्थक्षेत्रांना होणार लाभ

राज्यात 'ब' वर्ग दर्जा असलेली एकूण ४८० तीर्थक्षेत्र आहेत. या तीर्थक्षेत्रांना वाढीव निधीचा लाभ होणार आहे. तीर्थक्षेत्रास भेट देणाऱ्या भाविकांची संख्या ४ लाख असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक यांचे प्रमाणपत्र आवश्यक असते अशी माहिती यावेळी देण्यात आली.

# सई ताम्हणकर झळकणार हिंदी वेबसिरीज 'डब्बा कार्टेल'मध्ये!

मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) - मराठमोळी ग्लॅमरस अभिनेत्री सई ताम्हणकरचा प्रचंड मोठा चाहतावर्ग आहे. सध्या ती 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कॉमेडी शोच्या माध्यमातून जजच्या भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीला येत असते. मात्र, त्यासोबतच सईची चित्रपटसृष्टीत देखील अनेक कामे सुरु आहेत. नुकताच तिचा 'श्रीदेवी प्रसन्न' हा मराठी चित्रपट आला होता. यानंतर आता सई एका हिंदी वेबसिरीजमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नेटफ्लिक्सवर 'डब्बा कार्टेल' ही नवी वेबसिरीज येणार आहे, ज्यात सई अत्यंत महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे.



अभिनेता फरहान अख्तर नेटफ्लिक्सवर एक नवीकोरी वेब सीरिज घेऊन येत आहे. त्याच्या या सीरिजचं नाव 'डब्बा कार्टेल' असून अलीकडेच याची पहिली झलक समोर आली आहे. यामध्ये मराठीमोळी सई ताम्हणकर महत्त्वाची भूमिका साकारणार आहे. 'भक्षक' पाठोपाठ आणखी एक सीरिज प्रदर्शनाच्या मार्गावर असल्याने सध्या २०२४ हे वर्ष तिच्यासाठी सर्वार्थाने खास ठरत असल्याचं बोललं जात आहे.

ड्रग्जचा अवैध व्यापार यावर आधारित या सीरिजचं कथानक असणार आहे. सईसह अभिनेत्री शबाना आझमी, ज्योतिका, निमिषा सजयन, अंजली आनंद, गजराज राव, लिलैट दुबे आणि जिशू सेनगुप्ता अशा अनेक बड्या कलाकारांची फौज या सीरिजमध्ये पाहायला मिळणार आहे. सीरिजची पहिली झलक शेअर करत सई लिहिते, 'हा असा डबा आहे की, ज्याला तुम्ही कधीही विसरू शकत नाही.' दरम्यान, ही सीरिज नेटफ्लिक्सवर कधीपासून पाहता येणार हे मात्र अद्याप गुलदस्त्यात ठेवण्यात आलं आहे. सईने याआधीही बॉलिवूड गाजवलं आहे. सई 'मिमी' चित्रपटात क्रिती सॅननच्या खास मैत्रिणीच्या भूमिकेत दिसली होती. तिच्या या भूमिकेचे फार कौतुक झाले होते. त्यानंतर ती भूमी पेडणेकरची मुख्य भूमिका असलेल्या 'भक्षक' सिनेमातही महत्त्वाच्या भूमिकेत दिसली होती. यानंतर आता 'डब्बा कार्टेल'मध्ये सईचं काम पाहण्याची चाहत्यांना उत्सुकता लागून राहिली आहे.

## बॉलिवूडमधील एका हिट चित्रपटाचा होणार हॉलिवूडमध्ये रिमेक!

मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) - बॉलिवूडमध्ये अनेक प्रादेशिक भाषांमधील चित्रपटांचे रिमेक होत असतात. मात्र, यावेळेस बॉलिवूडमधील एका हिट चित्रपटाचा थेट हॉलिवूडमध्ये रिमेक होणार आहे. तसेच या चित्रपटाचा कोरिअनमध्येही रिमेक करण्याची तयारी सुरु आहे. हा चित्रपट म्हणजे अजय देवगण आणि तब्बू यांची प्रमुख भूमिका असलेला 'दृश्यम' हा चित्रपट मूळ मल्याळम इंडस्ट्रीत पहिल्यांदा प्रदर्शित झाला, ज्यात मोहनलाल या दाक्षिणात्य सुपरस्टारने प्रमुख भूमिका साकारली होती. ट्रेड अनालिस्ट रमेश बाला यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करून हॉलिवूड रिमेकविषयी माहिती दिली आहे. त्यांनी म्हटले की, 'पॅनोरमा स्टुडिओ 'दृश्यम' फ्रँचायझी हॉलिवूडमध्ये नेण्यासाठी तयार आहे. भारत आणि चीनमध्ये बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केल्यानंतर निर्माता कुमार मंगत पाठक आणि पॅनोरमा स्टुडिओने 'दृश्यम' हॉलिवूडमध्ये बनवण्याचा निर्णय घेतला आहे.

# 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रांचा विकासनिधी वाढवून ५ कोटी केल्याबद्दल वारकरी बांधवांनी मानले उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार

मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) - महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भरणाऱ्या यात्रा-जत्रांना भाविकांच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. या तीर्थक्षेत्रांना वर्षभर भेटी देणाऱ्या भाविकांची संख्या मोठी आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रांच्या परिसरात पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने निधीची मर्यादा २ कोटी रुपयांवरून ५ कोटी रुपये इतकी वाढविली आहे. राज्यातील आध्यात्मिक क्षेत्राच्या विकासाच्यादृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेतल्याबद्दल अखिल भारतीय वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष हभप प्रकाश बोधले महाराज यांच्यासह वारकरी संप्रदायातील प्रमुख महाराजांनी उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांची आज भेट घेऊन त्यांचे आभार मानले.



महाराष्ट्राला तीर्थक्षेत्रांची, संत-महात्म्यांची समृद्ध परंपरा लाभली आहे. या तीर्थक्षेत्रांचा विकास करतानाच याठिकाणी दर्शनासाठी येणाऱ्या भाविक-भक्तांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनातर्फे भरीव निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यादृष्टीने मोठ्या ग्रामीण तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी पायाभूत सुविधांच्या विकासाकरिता 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजना' सुरु करण्यात आली आहे. याअंतर्गत अ-वर्ग तीर्थक्षेत्रांसाठी निधीची मर्यादा '२ कोटी रूपये ते २५ कोटी रूपये' वरून '५ कोटी रूपये ते २५ कोटी रूपये' इतकी वाढविली आहे. तसेच, लहान ग्रामीण तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी पायाभूत सुविधांच्या विकासाकरिता 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना ब-वर्ग साठीच्या निधीची मर्यादा २ कोटी रुपयांवरून ५ कोटी रुपये इतकी वाढविली आहे. या निर्णयामुळे राज्याच्या आध्यात्मिक विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे, असे मत वारकरी बांधवांनी यावेळी व्यक्त केले.

राज्यातील तीर्थस्थळे हा समाजाचा भावनात्मक ठेवा आणि आध्यात्मिक संस्कार केंद्रे आहेत. त्यामुळे शासनाने वारकरी बांधवांनी केलेल्या मागणीचा भावनात्मक आणि व्यावहारिक पातळीवर विचार करून धाडसी निर्णय घेतला आहे. राज्य शासनाने उपलब्ध करून दिलेल्या निधीमुळे तीर्थक्षेत्रांचा पर्यटनदृष्ट्या देखील विकास होणार आहे. या निर्णयाचा लाभ राज्यातील सुमारे ४७९ ब वर्ग देवस्थानांना होणार आहे. त्यामुळे ब वर्ग तीर्थक्षेत्रावर येणारा प्रत्येक भाविक आपले मनापासून आभार मानत आहे, अशी सामूहिक भावनाही वारकरी बांधवांनी यावेळी व्यक्त केली.

## ज्येष्ठ पत्रकार अशोकचंद्र वानखेडे यांचे निधन

छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) - शुभश्री कॉलनी एन-६ सिडको, छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी व ज्येष्ठ पत्रकार अशोकचंद्र गणपतराव



वानखेडे (वय ६३ वर्ष) यांचे आज दिनांक १ मार्च २०२४ रोजी पहाटे २:४५ वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले, त्यांच्यावर एन-६, सिडको सेंट्रल नाका स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

डॉ. शरदचंद्र वानखेडे यांचे ते बंधू होत. अशोक वानखेडे यांनी अनेक वृत्तपत्रांतून स्थानिक प्रतिनिधी स्वरूपात काम केले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा असा परिवार आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# लोकसभा रंगतदार होणार; छत्रपती संभाजीनगरात विनोद पाटील यांची उमेदवारीची घोषणा

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- आगामी लोकसभा निवडणुकीचे पघडम वाजू लागले आहे. सर्वच राजकीय पक्षांसोबतच इच्छुकांकडूनही लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू झाली आहे. शहरातील सामाजिक कार्यकर्ते अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनोद पाटील यांनी शुक्रवारी येथे सत्कार समारंभात औरंगाबाद लोकसभा मतदार संघातून अपक्ष म्हणून निवडणूक लढण्याची घोषणा केली. विनोद पाटील यांच्या उमेदवारीमुळे आगामी लोकसभा निवडणूक रंगतदार होणार असल्याची चर्चा सुरू झाली.

उत्तरप्रदेशातील आग्रा येथील किल्ल्यात जेथे छत्रपती शिवाजी महाराजांना औरंगजेबाने दगाफटका करून अपमानित केले होते. त्याच दिवाण -ए -आम येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती समारंभाचे आयोजन सलग दुसऱ्या वर्षी विनोद पाटील यांनी केले होते. या यशस्वी आयोजनाबद्दल शहरातील नागरीकांच्यावतीने शुक्रवारी सिडकोतील मंगल कार्यालयात पाटील यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी जिल्हा शिवजयंती महोत्सव समितीचे



संस्थापक पृथ्वीराज पवार यांच्या हस्ते आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना पुष्पहार घालून आणि मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

या समारंभात विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक कार्यात अग्रसेर असलेली मंडळी विचारपीठावर उपस्थित होती. यावेळी प्रत्येकांनी आपल्या भाषणात विनोद पाटील यांनी आगामी लोकसभेची निवडणूक लढवावी, अशी मागणी केली. यात प्रा.रामदास गायकवाड, प्रा. चंद्रकांत भराट, संदीप बोरसे, सुरेश वाकडे, माजी उपमहापौर तथा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद जंजाळ, रेखा वाहटुळे ,माजी उपमहापौर राजू शिंदे, विजय वाहुळ, महेश गुजरे, सतीश तुपे, कलीम शेख आदींनी उत्तर देताना विनोद पाटील यांनी सक्रिय राजकारणात यावे आणि आगामी लोकसभेची निवडणू लढवावी,अशी मागणी केली.

यावेळी प्रत्येक वक्ता सभागृहातील उपस्थितांना विनोद पाटील यांना आपल्याला खासदार करायचे असल्याचे आवाहन करीत. सभागृहातील मंडळीही त्यांना होकार देत. या सत्काराला उत्तर देताना विनोद पाटील यांनी औरंगाबाद लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढविण्याची घोषणा केली. पाटील यांच्या घोषणेने औरंगाबाद लोकसभा मतदार संघातील निवडणूक अधिक रंगतदार होण्याची चित्र निर्माण होण्यास सुरवात झाली आहे.

# नोडल अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण; सतर्कतेने कामकाज करावे-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- निवडणूक प्रक्रियेत समाविष्ट प्रत्येक अधिकारी- कर्मचाऱ्यांनी आपल्याकडे सोपविलेल्या कामासंदर्भात निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा अभ्यास करुन विषय समजावून घ्यावा व सतर्कतेने व सजगतेने सोपविलेले कामकाज करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

जिल्हा नियोजन सभागृहात आज नोडल अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया, अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, मनपाचे अति.आयुक्त रणजीत पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे तसेच सर्व नोडल अधिकारी आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, निवडणूक अधिकाधिक पारदर्शक, निष्पक्ष व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी आचारसंहितेचे काटेकोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. त्यासाठी ही प्रक्रिया राबविणारा अधिकारी वर्ग हा अधिक प्रशिक्षित व अभ्यासपूर्ण असायला हवा. त्यादृष्टीने निवडणूक आयोगाने जारी केलेले नियम व सुचनांचा अभ्यास करुन अधिक सतर्कतेने काम करण्याची गरज आहे.

आचार संहिता निरीक्षण व नियंत्रण पथके, वाहन व्यवस्था, मतदान यंत्रे , स्वीप, माध्यम कक्ष, कायदा व सुव्यवस्था कक्ष, माहिती तंत्रज्ञान कक्ष, खर्च नियंत्रण कक्ष अशा विविध कक्षांच्या पथकांनी आपले सादरीकरण करुन आपल्यामार्फत होणाऱ्या निवडणूक विषयक कामकाजाची माहिती उपस्थितांना दिली.

# भाजपा महिला कार्यकर्त्यांनी भेट घेत मांडली तक्रार; जरागेंचं मराठा बांधवांना आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- मराठाआरक्षणासाठी लढा देणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे यांच्यावर छत्रपती संभाजीनगरच्या एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहे. रुग्णालयातून आज त्यांना डिस्चार्ज मिळण्याची शक्यता आहे. तत्पूर्वी आज अचानक भाजपच्या महिला पदाधिकाऱ्यांनी रुग्णालयात जाऊन मनोज जरांगे यांची भेट घेतली. यावेळी, गळ्यात भाजपाचा गमछा घातलेल्या या महिलांनी सोशल मीडियातून होणाऱ्या ट्रोलिंगचा मुद्दा उपस्थित केला. ''काही कार्यकर्ते सोशल मीडियावरून महिलांना शिवीगाळ करतात'' अशी तक्रार त्यांनी जरांगे यांच्याकडे केली. त्यानंतर, जरांगे यांनी माध्यमांशी बोलताना संबंधित घटनेवर स्पष्टीकरण दिले. तसेच, मराठा समाज बांधवांना आवाहनही केले आहे.

सोशल मीडियातून महिला पदाधिकाऱ्यांना ट्रोल करणाऱ्या कार्यकर्त्यांना सूचना देण्याची विंनती महिलांकडून मनोज जरांगे यांच्याकडे करण्यात आली. यासंदर्भात जरांगेंनी मराठा बांधवांना आवाहन केलं असून अशा टीकेचं मी समर्थन करणार नाही, याचा निषेधच. मराठा आणि ओबीसी बांधवांना माझं आवाहन आहे की, महिलांबद्दल कोणीही बोलू नये, मराठा आणि इतरही समाजाच्या पोरांनी महिलांबद्दल अर्वाच्य काहीही बोलू नये, ते मला सहन होणार नाही, तो माझा कार्यकर्ताही असणार नाही, असे आवाहनच मनोज जरांगे यांनी आंदोलक समर्थकांना केलं आहे.

मराठा समाजाचा हा विषय नाही, मग तो टीका करणारा आणि त्या ताई ते बघून घेतील. मात्र, असं करणाऱ्यांचा एकदम निषेध. केवल त्या महिला माझ्याकडे आल्या म्हणून नाही. तर, मला ६-७ महिन्यांपासून तुम्ही सगळे पाहता, महिलेंबद्दल असं काही आपल्याला सहन होऊ शकत नाही. पण, महिलांनीही ताई म्हणून यावं, पक्षाचा म्हणून येऊ नये. कुठे गळ्यात रुमाल घालू येऊ नये. ताई म्हणून आल्यास हा मनोज जरांगे तुमच्यासाठी अर्ध्या रात्री उभा राहिल. कुठल्याही जाती-धर्माच्या ताईंसाठी मी उभे राहिन, असे मनोज जरांगे यांनी म्हटलं.

# जिल्हास्तरीय बँक समन्वय समिती बैठक; मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत उद्दिष्ट पूर्ण करा-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- मराठवाडा विभागात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाअंतर्गत रोजगार देण्यासंदर्भात जिल्ह्याचे उद्दिष्ट सर्वात कमी साध्य झाले आहे. तरी सर्व बँकांनी या कार्यक्रमांतर्गत पात्र व्यक्तिंना लाभ देऊन स्वयंरोजगारास चालना द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे दिले.

जिल्हास्तरीय बँक समन्वय समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. बैठकीस रिजर्व बँकेचे सहा. महाव्यवस्थापक नरसिंग कल्याणकर, नाबार्डचे सहा. महाव्यवस्थापक सुरेश पटवेकर, बँक ऑफ महाराष्ट्रचे विभागीय व्यवस्थापक विवेक नाचणे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक स्वप्निल राठोड, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार, तसेच सर्व बँकांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचाआढावा घेतला. जिल्ह्यात ११५० चे उद्दिष्ट असतांना ४५५ इतके उद्दिष्ट साध्य झाले आहे. उर्वरित उद्दिष्ट सर्व बँकांनी मिळून पुर्ण करावे असे निर्देश त्यांनी दिले.

निवडणूक आचारसंहिता कालावधीत बँकांनी त्यांच्याकडील रोख रकमेची होणारी वाहतुक ही निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे सीव्हिजील या पोर्टलवर नोंद करुनच करावी,असेही त्यांनी सांगितले. विविध बँकांच्या जिल्ह्यातील ५४० शाखांनी या पोर्टलशी संलग्न केले असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. तसेच याच संदर्भात ई-एसएमएस प्रणालीसंदर्भात सर्व बॅंक अधिकाऱ्यांचे स्वतंत्र प्रशिक्षण निवडणूकीच्या अनुषंगाने घेण्यात यावे,असे निर्देशही त्यांनी दिले.

नाबार्ड मार्फत जिल्ह्यासाठी सन २०२४-२५ करिता १२ हजार ७६५ कोटी रुपयांचा संलग्नित संभाव्य पतआराखडा सादर करण्यात आला. त्यात पिककर्ज, कृषी कर्जे, सुक्ष्म व लघु उद्योगात व इतर प्राधान्य क्षेत्रात गुंतवणीकीबाबत सर्व बँकांनी द्यावयाच्या पतपुरवठ्याचे नियोजन सादर करण्यात आले.

गेल्या काही दिवसांत कर्जमाफीच्या फसव्या घोषणा, व्हिडीओ, मेसेज व्हायरल होत असून याप्रकाराला कोणीही बळी पडू नये असे आरबीआयच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सावध रहावे व अशा प्रकारांना बळी पडू नये असेही जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आवाहन केले.

# देहविक्री अड्ड्यावर पोलिसांचा छापा; ४ पिडितांची सुटका, डीवायएसपी पुजा नागरे यांची कारवाई

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- मोटारसायकल चोरी तसेच इतर गंभीर गुन्ह्यानंतर एमपीडीए ॲक्ट खाली शिक्षा भोगून आलेला सराईत गुन्हेगार चालवित असलेला देहविक्रीचा अड्डा ग्रामीण पोलीसांनी नुकताच उद्धवस्त करून दोन परप्रांतीय पिडीतांसह ४ महिलांची सुटका करण्यात आली. ही कारवाई अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक पथकाच्या सहायक पोलीस निरीक्षक आरती जाधव यांच्या पथकाने केली.

शहरालगत असलेल्या चिकलठाणा परिसरात यापुर्वी देहविक्रीच्या अड्ड्यावर छापामारी करण्यात आली होता. या कारवाईनंतरही चिकलठाणा पोलीस ठाण्याच्या हद्दीत हॉटेल सिद्धांत बिअर बार रेस्टॉरंट ॲण्ड परमिट रुम व ३०-३५ लॉजिंग ॲण्ड बोर्डिंगमध्ये देहविक्री सुरू असल्याची माहिती अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक पथकाच्या सहायक पोलीस निरीक्षक आरती जाधव यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस अधिक्षक मनीष कलवानिया, अपर पोलीस अधिक्षक सुनील लांजेवार, उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा नगारे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी आरती जाधव, पोलीस अमलदार कपील बनकर, मंजूषा हातकंगणे, सपना चरवंडे व ईशाद पठाण यांची सापळा रचला. या सापळ्यात पोलिसांनी बनावट ग्राहक पाठविला. यावेळी बनावट ग्राहकाने हॉटेलमध्ये गेल्यानंतर हॉटेलचा मालक जिवन केसरसिंग जारवाल (२४, रा. वेवळ्याची वाडी चितेगाव) याच्याकडे महिला पुरविण्याची मागणी केली. त्यावर दीड हजार रुपये जमा करण्यास सांगितल्यानंतर ३०-३५ लॉजिंग ॲण्ड बोर्डींगमधील रुम नंबर ३४० मध्ये जाण्यास सांगितले. रुममध्ये गेल्यानंतर महिला आल्याची खात्री पटल्यावर या बनवाट ग्राहकांने पोलिसांच्या पथकाला इशारा दिला. ग्राहकांकडून इशारा मिळताच पथकाने छापा मारून दोन मुर्शिदाबाद पश्चिम बंगाल येथील महिला तर २ जिल्ह्यातील महिलांना ताब्यात घेऊन त्यांची सुटका केली. या प्रकरणी आरोपी जिवन केसरसींग जालवाल याच्या विरुद्ध चिकलठाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

दहविक्रीचा अड्डा चालविणारा आरोपी जिवन केसरसींग जारवाल हा सराईत गुन्हेगार आहे. त्याच्या विरूद्ध चिकलठाणा पोलीस ठाण्यात दुचाकी चोरीचे ४ गुन्हे दाखल आहेत. तसेच दुखापत करणे, जाळपोळ करणे असे ३ गुन्हे मिळून एकूण ७ गुन्हे दाखल झालेले आहेत. त्याच्या वाढत्या कारवाया लक्षात घेऊन त्याच्या विरुद्ध एमपीडीए ॲक्ट अंतर्गत कारवाई करून १ वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले आहे. स्थानबद्धतेतून सुटका होताच त्याने देहविक्रीचा अड्डा सुरू केला.

दि. ०१/०३/२०२४

## जाहीर प्रगटन

या द्वारे वैजापूर नगर परिषद हद्दीत भगवान महावीर रुग्णालय वैजापूर श्रीमती. सविता पगारे वैद्यकीय अधिकारी यांची मा. उच्च न्यायलयाने रिट याचिका क्र. २१५/२००५ मधील संकीर्ण आवेदन क्र. १६९९/२०१९ च्या संदर्भीय दिलेल्या निकालातील मार्गदर्शक सुचनेवर अद्याप कार्यवाही न झाल्याने जनहित याचिका ३/२०२४ दाखल झाले आहे. दि.०३/०१/२०२४ रोजी झालेल्या सुनावणी अंती मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशा प्रमाणे COSTODION म्हणून नियुक्ती करण्यात अली आहे.

**स्वाक्षरीत/ -**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद वैजापूर**

# शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठ्यासाठी ८ हजार मेगावॅट वीजनिर्मिती निश्चित

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधान परिषदेत माहिती

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या माध्यमातून सौर ऊर्जेचा वापर करून ८ हजार मेगावॅट वीज निर्मिती क्षमता गाठण्यासाठी टेंडर निश्चित करण्यात आली असून हे देशातील विक्रमी काम आहे. संबंधित कंपन्यांना इरादापत्रे दिल्यानंतर त्यांच्याकडून १८ महिन्यात प्रकल्प उभारणी अपेक्षित असून त्यानंतर शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा बारा तास वीज नियमितपणे मिळेल, असे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान परिषदेत सांगितले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा करण्याची मागणी होते. त्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जमीन उपलब्ध करण्यात आली. त्यावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी आमंत्रित केलेल्या टेंडरना विक्रमी प्रतिसाद मिळाला असून ८ हजार मेगावॅट वीजनिर्मितीसाठीची टेंडर प्रक्रिया पूर्ण झाली आहे. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडून मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित कंपन्यांना इरादापत्रे देण्यात येतील. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू होण्यापूर्वीच इरादापत्रे देण्यात येतील. त्यानंतर १८ महिन्यात कंपन्यांनी प्रकल्प उभारणे अपेक्षित आहे.

ते म्हणाले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या अंतर्गत सौर ऊर्जेचा वापर करून वीजनिर्मिती करण्यासाठी देशातील नामांकित कंपन्यांनी निविदा सादर केल्या आहेत. या योजनेमुळे राज्यातील बहुतांश कृषी फीडर्सला वीज पुरवठ्याची व्यवस्था होईल.

त्यांनी सांगितले की, या योजनेत सादर झालेल्या निविदांमध्ये २ रुपये ९० पैसे ते ३ रुपये १० पैसे प्रति युनिट इतक्या चांगल्या दराने वीज उपलब्ध होणार आहे. सध्या सात रुपये प्रति युनिट दराने मिळणारी वीज शेतकऱ्यांना सुमारे दीड रुपये प्रति युनिट दराने दिली जाते. परिणामी साडेपाच रुपये प्रति युनिट अनुदान द्यावे लागते. हे अनुदान राज्य सरकारकडून तसेच उद्योगांवर क्रॉस सबसिडी लागू करून दिले जाते. आता कमी दराने वीज उपलब्ध झाल्यानंतर शेतकऱ्यांचा विजेचा दर तेवढाच ठेवला तरी अनुदानाचे पैसे कमी लागतील. परिणामी उद्योगांच्या वीज दरात वाढ करावी लागणार नाही किंबहुना ते अधिक स्पर्धात्मक करता येतील.

केंद्र सरकारने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० स्वीकारली असून ही योजना आपल्या राज्यात लागू करावी, अशी शिफारस केंद्र सरकारने इतर राज्यांना केली आहे. या योजनेचा अभ्यास करण्यासाठी कर्नाटकचे शिष्टमंडळ महाराष्ट्रात आले होते. राजस्थाननेही या योजनेचा अभ्यास केला आहे.

सौर ऊर्जेचा वापर करून केवळ शेतकऱ्यांसाठी वीज निर्मिती करायची आणि त्यातून त्यांना सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा करायचा, यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० एप्रिल २०२३ मध्ये उपमुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सुरू करण्यात आली आहे. या योजनेसाठी मोठ्या प्रमाणात सार्वजनिक जमीन उपलब्ध केली आहे. तसेच प्रती एकर पन्नास हजार रुपये वार्षिक भाडे देऊन खासगी जमीन भाड्याने घेण्यात येत आहे. सध्या शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा व रात्री असा दोन पाळ्यांमध्ये आठ तास वीज पुरवठा केला जातो. रात्री सिंचन करताना शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे शेतकऱ्यांना केवळ दिवसा पंपांसाठी वीज पुरवठा करावा, अशी मागणी सातत्याने केली जाते.

# लोकशाही दिन सोमवारी

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- जिल्हास्तरीय लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. मार्च महिन्यातील लोकशाही दिन सोमवार दि. ४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी १२ वा. होणार आहे. लोकशाही दिनासाठी लोकांचे अर्ज सकाळी ११ ते १२ या वेळात स्विकारण्यात येतील. नागरिकांनी आपले अर्ज दाखल करावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे यांनी केले आहे.

जा.क्र.नपवै/कावि/म.भाडे/२०२४/४४१
कार्यालय नगर परिषद वैजापूर
जिल्हा :- छत्रपती संभाजीनगर
दिनांक : ०१/०३/२०२४

## जाहिर निवीदा सुचना

सर्व अनुभवी मंगल कार्यालय चालकांना कळविण्यात येते की, वैजापूर नगर परिषद मालकीचे बाजारतळ सांस्कृतिक सभागृह माहे सन २०२४-२०२५ पासुन (०३) तीन वर्षा करीता वापरासाठी भाडे करार तत्वावर देणे आहे. अनुभवी मंगल कार्यालय चालकांनी दिनांक ०९/०३/२०२४ रोजी दुपारी ०१.३० वाजेपर्यंत नगर परिषदेस प्राप्त होतील अशा बेताने सील बंद पाकीटात आपल्या निवीदा दरपत्रक बाजारतळ, सांस्कृतिक सभागृह यांचे दरपत्रक स्वतंत्र सादर करावयात.

निवीदाच्या अटी नियम नगर परिषद कार्यालयात कर विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

**स्वाक्षरीत/ -**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद वैजापूर**

-: जाहीर आवाहन :-

**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर**

(आरोग्य विभाग)

**राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम २०२४**



**दि. ०३ मार्च २०२४**

*** दोन थेंब जीवनाचे, प्रत्येक बालक महत्वाचे, डोस द्या पोलिओचे ***

**या दिवशी ५ वर्षाखालील सर्व बालकांना नजीकच्या पल्स पोलिओ लसीकरण केंद्रावर पोलिओ डोस आवश्य पाजा.**

* छत्रपती संभाजीनगर शहरात १९९९ नंतर एकही पोलिओ रुग्ण आढळलेला नाही * सन २०११ नंतर भारतात एकही पोलिओ रुग्ण आढळून आलेला नाही * जागतिक आरोग्य संघटनेने भारत देश पोलिओ मुक्त झाल्याचे घोषित केले असले तरीही या आजाराचे पूर्ण उच्चाटन झालेले नाही व पोलिओचे रुग्ण आढळून येणाऱ्या देशांमधून या विषाणुची भारतात पुन्हा लागण होण्याचा धोका नाकारता येत नाही. यासाठी ही राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम महत्वाची आहे.

**स्थळ : मनपाची सर्व आरोग्य केंद्र व रुग्णालये, सिद्धार्थ गार्डन, रेल्वेस्टेशन, बसस्टॅन्ड, विमानतळ, मनपाचे अधिकृत पोलिओ बुध, इत्यादी**

**वेळ सकाळी ८ ते संध्याकाळी ५**

*** या पूर्वी पोलिओचा डोस दिला असला तरीही बाळ आजारी असले तरीही बाळ नुकतेच जन्मलेले असले तरीही.**

| स्वाक्षरीत/ - | स्वाक्षरीत/ - | स्वाक्षरीत/ - |
|---|---|---|
| डॉ. पारस मंडलेचा | रणजित पाटील | जी. श्रीकांत |
| वैद्यकीय आरोग्य अधिकारी | अति.आयुक्त - १ | आयुक्त तथा प्रशासक, भा.प्र.से |
| महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर | महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर | महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर |